०६-०४-२०२३

# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था वडाळा येथे श्री रामभक्त ,पवनपुत्र, श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा.




वडाळा: श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण वडाळा येथे आज श्री हनुमान जन्मोत्सव २०२३ निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्रीराम भक्त पवनपुत्र हनुमान प्रतिमेचे पूजन, राम कथा, हनुमान चालीसा पठण, श्री हनुमान स्तोत्र पठण इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य माननीय योगेश गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे डिझेल मेकॅनिक व्यवसायाचे निदेशक माननीय श्री आकाश राठोड सर लाभले होते, तसेच कार्यक्रमाचे अतिथी म्हणून निदेशिका माननीय संध्याराणी शिंदे मॅडम , आणि माननीय अरुणा कोरे मॅडम यांची व्यासपीठावर उपस्थिती होती, कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमेची पूजन आणि विजतंत्री द्वितीय वर्षाचा विद्यार्थी जय कोल्हटकर यांनी सादर केलेल्या श्री हनुमान स्तोत्र पठणने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष राठोड सरांनी व्यासपीठावर उपस्थित अतिथी माननीय शिंदे मॅडम, व कोरे मॅडम यांचा सत्कार केला. तसेच रामभक्त श्री हनुमान यांच्या भक्ती विषयक, रामायणा मधल्या काही जातक कथांचा समावेश असलेले व्याख्यान दिले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजतंत्री विभागाचे निदेशक श्री संभाजी जाधव सर यांनी केले, मोटर सायकल मेकॅनिक विभागाची निदेशक माननीय राहुल गवळी सर यांनी पवनपुत्र हनुमान यांच्या प्रतिमेचे आरेखन केले. सदर कार्यक्रमाला आय टी आय मधील ४० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.